## प्रकरण-3

## (नियम पुस्तिका-2)

## अधिकारी व कर्मचा-यांचे अधिकार व कार्ये

कर्तव्ये

**उप प्रमुख अभियंता (रस्ते) नियोजनः**

1) खात्यातील कार्यालयीन कामकाजावर प्रशासकि नियंत्रण ठेवणे.

2) रस्त्याची संकल्पचित्रे करण्यासाठी व रस्ते सुरक्षितता लेखा परिक्षाण करण्यासाठी निविदा मागवून सल्लागाराची नेमणूक करणे आणि चर पुनर्भरण कामाकरिता निविदा मागवून परिमंडळनिहाय कंत्राटदाराची नेमणूक करणे.

3) उपरोक्त कामे करण्याकरीता आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करणे.

4) कामाच्या संदर्भात महानगरपालिका आणि शासनाच्या विविध प्राधिकरणे, संस्था यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधणे.

5) कार्यकारी अभियंत्यांनी सादर केलेल्या विविध प्रस्तावांबाबत आढावा घेणे.

6) वरिष्ठांनी निर्देशित केलेल्या विविध खात्यांच्या बैठकीना व समिती सभांना उपस्थित राहणे.

**कार्यकारी अभियंताः**

1) माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलांवर सुनावणी घेणे.

2) रस्ते नियोजन विभागाशी संबंधित विविध सभांना उपस्थित राहणे.

3) रस्ता रेषेतील बाधित क्षेत्र, फॉर्मेशन लेव्हल, आराखडा मंजूरी अंशत: पूर्णत्व पत्र व पूर्णत्व पत्र याबाबत अभिप्राय देणे.

4) महानगरपालिकेच्या कामासाठी, आर.एम.सी.प्लान्ट / अस्फाल्ट प्लान्ट / पेव्हर ब्लॉक / क्रशर / पूर्वाकारीत वस्तू उत्पादनाचे यंत्रसंच (Pre-cast Items) यांचे व खाजगी सामुग्री चाचणी प्रयोगशाळा यांचे नोंदणीकरण व नुतनीकरणासाठी आवश्यक पत्रव्यवहार व अहवाल सादर करणे.

5) वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ते (नियोजन) विभागाशी संबंधित इतर कामे करणे.

**सहाय्यक अभियंताः**

1) रस्ता रेषेती बाधित क्षेत्र, फॉर्मेशन लेव्हल, आराखडा मंजूरी अंशत: पूर्वत्व पत्र व पूर्णत्व पत्र यासंदर्भातील प्रस्तावांची पडताळणी करणे ( स्थळ पाहणी करुन प्रस्ताव वरिष्ठ अधिका-याच्या मंजूरीस सादर करणे).

2) महानगरपालिकेच्या कामासाठी, आर.एम.सी.प्लान्ट / अस्फाल्ट प्लान्ट / पेव्हर ब्लॉक / क्रशर / पूर्वाकारीत वस्तू उत्पादनाचे यंत्रसंच यांचे व खाजगी सामुग्री चाचणी प्रयोगशाळा यांचे नोंदणीकरण व नुतनीकरणासाठीच्या प्रस्तावांची पडताळणी करणे. (स्थळ पाहणी करुन प्रस्ताव वरिष्ठ अधिका-याच्या मंजूरीस सादर करणे)

3) माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये दाखल केलेल्या अर्जानुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी म्हणून कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती पुरवणे.

4) विविध अहवालांची पडताळणी करणे, तक्रारीस व माहिती अधिकार कायदा अंतर्गत प्राप्त होणा-या अर्जास उत्तर देणे इत्यादी.

5) वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ते (नियोजन) विभागाशी संबंधित इतर कामे करणे.

6) महापालिकेच्या परिमंडळ-1 ते परिमंडळ-7 मधील चर पुर्नबांधणीच्या कामाकरिता निविदा मागविणे.

7) रस्ते सुरक्षा परिक्षकांच्या नियुक्तींसंबंधीत निविदा मागविणे. (EOI/RFP)

8) रस्त्यांच्या रेखाचित्र कामांसाठी रस्ते रेखाचित्र सल्लागारांची नेमणूक करणे आणि रस्ते सुरक्षा लेखा परिक्षकांची नेमणूक करणे.

**<u>दुय्यम अभियंता :</u>**

1) रस्ते बांधणीसंबंधीचे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची स्थळ पाहणी करुन छाननी करणे व अहवाल तयार करणे. तसेच अंशत: पूर्णत्व पत्र व पूर्णत्व व पत्र फॉर्मेशन याबाबत अभिप्राय तयार करणे.

2) महानगरपालिकेच्या रस्त्यांच्या कामासाठी, आर.एम.सी.प्लान्ट / अस्फाल्ट प्लान्ट / पेव्हर ब्लॉक / क्रशर / पूर्वाकारीत वस्तू उत्पादनाचे यंत्रसंच यांचे व खाजगी सामुग्री चाचणी प्रयोगशाळा यांचे नोंदणीकरण व नुतनीकरणासाठीच्या प्रस्तावांची स्थळ पाहणी करुन छाननी करणे व अहवाल तयार करणे.

3) विविध अहवाल, तक्रारीस व माहिती अधिकार कायदा अंतर्गत प्राप्त होणा-या अर्जास दयावयाच्या उत्तरांचा मसूदा तयार करणे इत्यादी.

4) वरिष्ठांच्या आदेशानुसार रस्ते (नियोजन) विभागाशी संबंधित इतर कामे करणे.

5) महापालिकेच्या परिमंडळ-1 ते परिमंडळ-7 मधील चर पुर्नबांधणीच्या कामाकरिता निविदा मागविणे.

6) रस्ते सुरक्षा परिक्षकांच्या नियुक्तींसंबंधीत निविदा मागविणे. (EOI/RFP)